11 APR 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# उषा इथापे यांचे मोठेपण आले सामोरे

## डॉ. राजन गवस; 'घरंदाज सावली' ग्रंथावर विद्यापीठात चर्चा

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १० : 'शिवाजी विद्यापीठाच्या माजी कुलसचिव डॉ. उषा इथापे या केवळ इथे शिकलेल्या विद्यार्थ्यांच्या माताच नव्हत्या, तर एक थोर विदुषी सुद्धा होत्या. त्यांचे मोठेपण विस्मृतीच्या पडद्याआडून सामोरे आणण्याचे काम डॉ. रणधीर शिंदे यांच्या 'घरंदाज सावली' या पुस्तकाने केले आहे', असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाचे शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन आणि डॉ. आप्पासाहेब पवार कमवा व शिका प्रबोधिनीतर्फे 'घरंदाज सावली - डॉ. उषा इथापे : कार्य आणि आठवणी' या



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात बुधवारी 'घरंदाज सावली' या ग्रंथावर आयोजित चर्चासत्रात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी डावीकडून गजानन साळुंखे, किसनराव कुराडे, राजन गवस, माणिकराव साळुंखे, एस. एन. पठाण, सी. टी. पवार, भारती पाटील, रणधीर शिंदे उपस्थित होते.

ग्रंथावर आयोजित चर्चासत्रात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

डॉ. गवस म्हणाले, डॉ. इथापे यांनी मार्गदर्शकाविना अत्यंत भरीव अशा प्रकारचे पीएच.डी. संशोधन केले. डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी त्या संदर्भात अत्यंत मौलिक स्वरूपाचे लिहिले आहे.' माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे म्हणाले, 'डॉ. इथापे यांनी शिवाजी विद्यापीठासाठी घेतलेली अविश्रांत मेहनत न विसरता येणारी आहे. त्यांचे वात्सल्य आणि योगदान यामुळे विद्यापीठातील विद्यार्थ्यांची पहिली फळी घडली, जिने विद्यापीठाचा लौकिक सर्वदूर केला.'

नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एस. एन. पठाण म्हणाले, 'डॉ. आप्पासाहेब पवार, उषा इथापे आणि शिवाजी विद्यापीठ या तीन गोष्टींमुळे माझ्यासारखा एक गवंड्याचा पोर राज्याचा शिक्षण संचालक, मध्य भारतातील एका मोठ्या विद्यापीठाचा कुलगुरू होऊ शकला. येथूनच सर्वधर्मसमभावाची शिकवण घेऊन जगभर जाता येऊ शकले.'

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'कुलसचिव म्हणून डॉ. इथापे यांच्यावर मोठी जबाबदारी होती. त्या जबाबदारीच्या सोबतच इथल्या विद्यार्थ्यांना घडविण्याची, उभे करण्याची जबाबदारीही त्यांनी शिरावर घेतली होती. त्याचे दर्शन या पुस्तकाद्वारे होते.'

यावेळी प्रा. किसनराव कुराडे, गजानन साळुंखे, डॉ. रणधीर शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी स्वागत केले. प्रबोधिनीचे उपाध्यक्ष प्रा. सी. टी. पवार यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला. यावेळी 'शब्दशिवार' प्रकाशनाचे इंद्रजित घुले, मुद्रितशोधक विष्णू पावले यांचा सत्कार करण्यात आला. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. राजेश पाटील यांनी आभार मानले.

11 APR 2024

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या उभारणीत उषा इथापे यांचे भरीव योगदान

## डॉ. राजन गवस : 'घरंदाज सावली' पुस्तकावर चर्चासत्र

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या माजी कुलसचिव डॉ. उषा इथापे या केवळ इथे शिकलेल्या विद्यार्थ्यांच्या माताच नव्हत्या, तर एक थोर विदुषीसुद्धा होत्या. विद्यापीठाच्या उभारणीत त्यांचे भरीव योगदान असून त्यांचे मोठेपण विस्मृतीच्या पडद्याआडून समोर आणण्याचे काम डॉ. रणधीर शिंदे यांच्या 'घरंदाज सावली' या पुस्तकाने केले आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांनी बुधवारी केले.




शिवाजी विद्यापीठात 'घरंदाज सावली' या पुस्तकावर आयोजित चर्चासत्रात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी मार्गदर्शन केले. यावेळी गजानन साळुंखे, किसनराव कुराडे, डॉ. राजन गवस, डॉ. माणिकराव साळुंखे, डॉ. एस. एन. पठाण, सी. टी. पवार, डॉ. भारती पाटील आणि डॉ. रणधीर शिंदे उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठाचे कै. श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन आणि डॉ. आप्पासाहेब पवार कमवा व शिका प्रबोधिनी यांच्यावतीने डॉ. रणधीर शिंदे संपादित 'घरंदाज सावली- डॉ. उषा इथापे : कार्य आणि आठवणी' या ग्रंथावर चर्चासत्र आयोजित केले. त्या चर्चासत्रात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे म्हणाले, डॉ. इथापे यांनी विद्यापीठासाठी घेतलेली अविश्रांत मेहनत न विसरता येणारी आहे. नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एस. एन. पठाण म्हणाले, डॉ. आप्पासाहेब पवार, डॉ. इथापे आणि विद्यापीठ या तीन गोष्टींमुळे माझ्यासारखा एक गवंड्याचा पोर राज्याचा शिक्षण संचालक, मध्य भारतातील एका मोठ्या विद्यापीठाचा कुलगुरू होऊ शकला. किसनराव कुराडे, विद्यापीठाचे माजी कर्मचारी गजानन साळुंखे, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले. अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी स्वागत केले. डॉ. रणधीर शिंदे यांनी पुस्तकाविषयी मनोगत व्यक्त केले. प्रा. सी. टी. पवार यांनी परिचय करून दिला. सुश्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. राजेश पाटील यांनी आभार मानले.

11 APR 2024

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



सुधाकर गायकवाड लिखित 'दलित सौंदर्यशास्त्र' ग्रंथाचे प्रकाशन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रा. श्यामसुंदर मिरजकर, डॉ. श्रीकृष्ण महाजन, सुधाकर गायकवाड, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. देवानंद सोनटक्के व डॉ. सचिन गरुड उपस्थित होते.

# फुले, शाहू, आंबेडकर यांच्याकडून समाजबदलाचा कृतिशील कार्यक्रम

## सुधाकर गायकवाड : विद्यापीठात फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहाचे उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या त्रयीने विषमतावादी मूल्यांना नाकारून समाजबदलासाठीचा कृतिशील कार्यक्रम देऊन समता प्रस्थापनेच्या दिशेने समाजाला नेण्याचे काम केले, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत सुधाकर गायकवाड यांनी बुधवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने आयोजित फुले, शाहू, आंबेडकर सप्ताहाचे उद्घाटन राजर्षी शाहू सभागृहात झाले. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे प्रमुख उपस्थित होते. यावेळी गायकवाड लिखित 'दलित सौंदर्यशास्त्र' या ग्रंथाचे प्रकाशन केले.

डॉ. गायकवाड म्हणाले, तत्कालीन प्रचलित समाजव्यवस्था ही विषमतेला धर्मसत्तेचा आधार देऊन तिचे समर्थन करीत होती. या मानवी वर्तन नियंत्रित करणाऱ्या विषमताधारित समाजव्यवस्थेला आव्हान देऊन नाकारण्याचे काम बुद्धानंतर फुले, शाहू, आंबेडकर यांनी केले. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, फुले, शाहू, आंबेडकरांनी महाराष्ट्रात खूप मोठी वैचारिक क्रांती घडवून आणली. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी प्रास्ताविक, डॉ. अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. दीपा श्रावस्ती यांनी आभार मानले.

11 APR 2024

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# फुले, शाहू, आंबेडकरांकडून समाजबदलाचा कृतिशील कार्यक्रम

## सुधाकर गायकवाड : शिवाजी विद्यापीठात फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहाचे उद्घाटन

कोल्हापूर : प्रतिनिधी

महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या त्रयीने विषमतावादी मूल्यांना नाकारून समाज बदलासाठीचा कृतिशील कार्यक्रम देऊन समता प्रस्थापनेच्या दिशेने समाजाला नेण्याचे काम केले, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत सुधाकर गायकवाड यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन



व विकास केंद्रातर्फे आयोजित फुले, शाहू, आंबेडकर सप्ताहाचे उद्घाटन बुधवारी राजर्षी शाहू सभागृहात झाले. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

डॉ. गायकवाड म्हणाले, तत्कालीन प्रचलित समाजव्यवस्था ही विषमतेला धर्मसत्तेचा आधार देऊन तिचे समर्थन करीत होती. या मानवी वर्तन नियंत्रित करणाऱ्या विषमताधारित समाजव्यवस्थेला आव्हान देऊन नाकारण्याचे काम बुद्धानंतर फुले, शाहू, आंबेडकर यांनी केले.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, फुले, शाहू, आंबेडकरांनी महाराष्ट्रात खूप मोठी वैचारिक क्रांती घडवून आणली. त्या क्रांतीला कृतिशीलतेची मोठी जोड होती.

प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते सुधाकर गायकवाड लिखित 'दलित सौंदर्यशास्त्र' या ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. या ग्रंथावर झालेल्या चर्चेत डॉ. देवानंद सोनटक्के, डॉ. सचिन गरुड आणि प्रा. श्यामसुंदर मिरजकर यांनी सहभाग घेतला.

प्रास्ताविक केंद्र संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन, तर डॉ. अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. दीपा श्रावस्ती यांनी आभार मानले. कार्यक्रमास डॉ. मुरलीधर भानारकर, डॉ. कैलास सोनवणे, उपकुलसचिव विलास सोयम आदी उपस्थित होते.

11 APR 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# फुले, शाहू, आंबेडकरांकडून समाजाला कृतिशील कार्यक्रम : डॉ. गायकवाड

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विषमतावादी मूल्यांना नाकारून समाज बदलासाठीचा कृतिशील कार्यक्रम देत समता प्रस्थापित करण्याचे काम केले, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत सुधाकर गायकवाड यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकासकेंद्राच्या वतीने आयोजित फुले, शाहू, आंबेडकर सप्ताहाचे उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते, तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे प्रमुख उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, फुले, शाहू, आंबेडकरांनी महाराष्ट्रात वैचारिक क्रांती घडवून आणली. त्या क्रांतीला कृतिशीलतेची मोठी जोड होती. बुद्धीचा नियंत्रित वापर सामाजिक हित डोळ्यांसमोर ठेवून करणे आवश्यक आहे, ही प्रेरणा या त्रयींकडून आपणास मिळत राहते.

स्वागत व प्रास्ताविक केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले. डॉ. अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन केले, डॉ. दीपा श्रावस्ती यांनी आभार मानले.

11 APR 2024

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातील ८० पैकी ३० पेटंटला ग्रँट

## संशोधनाने शिवाजी विद्यापीठाची एनआयआर रँक वाढणार

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील ८० संशोधकांना पेटंट प्राप्त झाली आहेत. त्यापैकी ३० पेटंटला केंद्रासह इतर देशांची ग्रँट मिळाली आहे. उर्वरीत ५० पेटंट ग्रँट मिळण्याच्या प्रक्रियेत आहेत. परिणामी, विद्यापीठाचे एनआयआर रँकिंग वाढणार आहे. या पेटंटमुळे संशोधकांचा बायोडेटा स्ट्राँग होत असल्याची चर्चा शिक्षण क्षेत्रात आहे.

विद्यापीठाने विद्यार्थी हिताचे निर्णय घेत अनेक अभ्यासक्रमांसह प्राथमिक सोयीसुविधा दिल्या आहेत. संशोधकांना आवश्यक मदत करत विद्यापीठ स्वनिधीतून पाच लाखांपर्यंतची मदत केली आहे. विद्यापीठ प्राथमिक सोयींसह शैक्षणिक गुणवत्ता वाढीचा सातत्याने प्रयत्न करत आहे. परिणामी विद्यापीठाला नॅकचे 'ए्लसप्लस' मानांकन मिळाले



असून राज्यात अव्वल दर्जा प्राप्त केला आहे. विद्यापीठ राज्य किंवा केंद्राचे प्रकल्प घेण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे.

विद्यार्थीदशेतच संशोधनाची आवड निर्माण व्हावी म्हणून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनाही संशोधनासाठी मदत केली जात असल्यामुळे अलीकडे पदवीधर संशोधक विद्यार्थ्यांची संख्या वाढू लागली आहे. प्राध्यापकांत संशोधन करून पेटंट मिळवण्याची स्पर्धा लागली आहे. समाजोपयोगी संशोधनासाठी सामंजस्य करारातून संशोधनांचा समाजाला कसा उपयोग होईल, याकडे दुर्लक्ष होत असल्याची चर्चा आहे. पेटंट मिळाल्यानंतर प्राध्यापकांचा बायोडेटा स्ट्राँग होतो आणि त्यांना विभागप्रमुख, अधिष्ठाता, केंद्र संचालक, कुलसचिव, प्र-कुलगुरू, कुलगुरू यासारखी पदे मिळतात. कंपन्या पेटंटचे व्यवसायात रूपांतर करायला तयार असतात, पण संशोधकाने त्यामध्ये रस घेऊन प्रयत्न केले पाहिजेत, असे शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांचे मत आहे.

संशोधकांनी मिळवलेल्या पेटंटसंदर्भात त्याचे व्यवसायात रूपांतर करता येते. परंतु पेटंट मिळाल्यानंतरचे काम खूपच संथ गतीने होते, परिणामी समाजोपयोगी संशोधन असूनही ते रूर राहते. विज्ञान विभागात संशोधन होत असल्याने पेटंट मिळतात. याउलट स्थिती सामाजिकशास्त्रांसह कला व वाणिज्य विभागाची आहे. पीएच.डी.पुरतेच संशोधन होते, त्यानंतर त्याचा विचार केला जात नसल्याची चर्चा आहे.

### व्यवसायात रूपांतर करण्याचा प्रयत्न सुरू

विद्यापीठातील प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी केलेल्या संशोधनाचे रूपांतर पेटंटमध्ये झाले आहे. पहिल्या टप्प्यात पेटंट मिळणे महत्वाचे आहे. या संशोधनाला टप्प्याटप्प्याने ग्रँट मिळतील. त्यानंतर एखाद्या इंडस्ट्रीला पाहिजे असेल तर हे पेटंट विकले जाईल. सध्या जास्तीत जास्त पेटंटचे व्यवसायात रूपांतर करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

**डॉ. पी. एस. पाटील**
**(प्र-कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ)**

### स्टार्टअपचा प्रयोग थंडावला

नवसंकल्पनांना चालना देण्यासाठी केंद्राने स्टार्टअपसाठी २ ते ५ कोटींचा निधी देऊन स्वतंत्र विभागाची स्थापना केली. हे विभाग विद्यापीठासह महाविद्यालयांतही आहेत. विद्यार्थी, प्राध्यापकांच्या संकल्पनांना साकारण्याचा प्रयत्न केला जातो. सध्या स्टार्टअपची प्रक्रिया मंदावल्याची चर्चा आहे.

11 APR 2024 पुढारी

जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पाण्याचे विभाजन करून हायड्रोजन निर्मितीसाठी भारतीय व जर्मन पेटंट

## प्रा. डॉ. सागर डेळेकर, प्रमोद कोयले यांचे संशोधन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

पाणी आणि सूर्यप्रकाश यांसारख्या नैसर्गिक स्रोतापासून ग्रीन हायड्रोजनची निर्मिती, त्याचा इंधन म्हणून वापर व कमी कार्बन उत्सर्जन यावर केलेल्या संशोधनाला भारत व जर्मन यांचे पेटंट मिळाले आहे. शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागातील प्रा. सागर डेळेकर व संशोधक विद्यार्थी प्रमोद अभंगराव कोयले यांनी हे संशोधन केले आहे .

नॅनो समिश्रे आधारित हायड्रोजन निर्मितीसाठी पाण्याचे विभाजन याचा सखोल अभ्यास केला. या संशोधनाला विज्ञानामध्ये एक विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

संपूर्ण जगात सध्या पेट्रोल, डिझेल, कोळसा इत्यादी पारंपरिक इंधनांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात आहे, जो आगामी भविष्यात एके दिवशी नक्की संपुष्टात येईल. त्याचबरोबर वाढते जागतिक प्रदूषण, उच्च कार्बन उत्सर्जन व त्यामुळे उद्भवलेल्या आरोग्य समस्या इत्यादींसाठी हे पारंपरिक स्रोत जबाबदार आहेत.




बहुतेक शास्त्रज्ञ हे पाणी, सूर्यप्रकाश, वारा इत्यादी नैसर्गिक घटकांचा वापर करून इंधन स्रोत विकसित करीत आहेत. यामध्ये हायड्रोजनचा वापर ऑटोमोबाईल्स, उद्योग, वीज उत्पादन आणि इतर अनेक क्षेत्रांमध्ये केला जाऊ शकतो.

याच अनुषंगाने प्रा. डेळेकर व कोयले यांनी धातू ऑक्साईड, मेटल-ऑरगॅनिक फ्रेमवर्क व कार्बन अब्जांशनलिका आधारित नॅनो समिश्रे वापरून फोटो इलेक्ट्रोकेमिकल पद्धतीने पाण्याचे विभाजन व त्याचा अभ्यास केला. ही नॅनो समिश्रे पाण्यापासून हायड्रोजन तयार करण्यासाठी उपयुक्त आहेत. अमेरिकेच्या 'अप्लाईड नॅनो मटेरियल्स' आणि 'इंटरनॅशनल जर्नल ऑफ हायड्रोजन एनर्जी' या संशोधन पत्रिकांमध्येही प्रकाशित झाले आहे.

11 APR 2024
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# हायड्रोजन निर्मितीसाठी भारतीय, जर्मन पेटंट

## विद्यापीठातील डेळेकर, कोयले यांचे संशोधन



सागर डेळेकर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील प्रा. डॉ. सागर डेळेकर, त्यांचा संशोधक विद्यार्थी प्रमोद अभंगराव कोयले यांनी नॅनो संमिश्रे आधारित हायड्रोजन निर्मितीसाठी पाण्याचे विभाजन याचा सखोल अभ्यास केला असून यास १ भारतीय, १ जर्मन पेटंट मिळाले.

डेळेकर, कोयलेंनी धातू ऑक्साइड, मेटल-ऑरगॅनिक फ्रेमवर्क व कार्बन अब्जांशनलिका आधारित नॅनो संमिश्रे वापरून फोटो इलेक्ट्रोकेमिकल पद्धतीने पाण्याचे विभाजन व त्याचा अभ्यास केला. ही नॅनो संमिश्रे पाण्यापासून हायड्रोजन तयार करण्यासाठी उपयुक्त आहेत हे साध्य झाले. अमेरिकेच्या अप्लाइड नॅनो मटेरिअल्स, इंटरनॅशनल जर्नल ऑफ हायड्रोजन एनर्जी संशोधन पत्रिकांमध्येही ते प्रकाशित झाले.

11 APR 2024 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पाण्याचे विभाजन करून हायड्रोजन निर्मितीला भारतीय, जर्मनचे पेटंट

## शिवाजी विद्यापीठातील डॉ. सागर डेळेकर, प्रमोद कोयले यांचे संशोधन

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील रसायनशास्त्र अधिविभागातील डॉ. सागर डेळेकर आणि त्यांचा संशोधक विद्यार्थी प्रमोद कोयले यांनी नॅनो संमिश्रे आधारित हायड्रोजन निर्मितीसाठी पाण्याचे विभाजन याचा सखोल अभ्यास केला. या संशोधन कार्यास त्यांना एक भारतीय व तसेच एक जर्मन पेटंट मिळाले आहे. त्यामुळे या संशोधनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

संपूर्ण जगात सध्या पेट्रोल, डिझेल, कोळसा इत्यादी पारंपरिक इंधनांचा मोठ्या प्रमाणावर वापर



डॉ. सागर डेळेकर



प्रमोद कोयले

केला जातो. जो भविष्यात संपुष्टात येईल. त्याचबरोबर वाढते जागतिक प्रदूषण, उच्च कार्बन उत्सर्जन व त्यामुळे उद्‌भवलेल्या आरोग्य समस्या इत्यादीसाठी हे पारंपरिक स्रोत जबाबदार आहेत. म्हणूनच बहुतेक शास्त्रज्ञ पाणी, सूर्यप्रकाश, वारा इत्यादी नैसर्गिक घटकांचा वापर करून इंधन स्रोत विकसित करीत आहेत. यामध्ये हायड्रोजनचा वापर ऑटोमोबाईल्स, उद्योग, वीज उत्पादन व इतर अनेक क्षेत्रांत केला जाऊ शकतो. याच अनुषंगाने प्रा. डेळेकर व कोयले यांनी हे संशोधन केले आहे. या संशोधनाबद्दल व पेटंटसबद्दल प्रा. डेळेकर व कोयले यांचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र- कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदींनी अभिनंदन केले.

**काय आहे संशोधन** : याच अनुषंगाने प्रा. डेळेकर व कोयले यांनी धातू ऑक्साईड, मेटल-ऑरगॅनिक फ्रेमवर्क, कार्बन अब्जांशनलिका आधारित नॅनो संमिश्रे वापरून फोटो इलेक्ट्रो केमिकल पद्धतीने पाण्याचे विभाजन व त्याचा अभ्यास केला. ही नॅनो संमिश्रे पाण्यापासून हायड्रोजन तयार करण्यासाठी उपयुक्त आहेत हे या संशोधनातून साध्य झाले आहे.

11 APR 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पाण्याचे विभाजन करून हायड्रोजन निर्मितीसाठी दोन पेटंट

## विद्यापीठातील डेळेकर, कोयले यांचे संशोधन : फोटोइलेक्ट्रोकेमिकल पद्धतीचा वापर



डॉ. डेळेकर



प्रमोद कोयले

कोल्हापूर, ता. १० : शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील प्रा. डॉ. सागर डेळेकर आणि संशोधक विद्यार्थी प्रमोद अभंगराव कोयले यांनी नॅनो संमिश्रे आधारित हायड्रोजन निर्मितीसाठी पाण्याचे विभाजन याचा सखोल अभ्यास केला. त्यांच्या या संशोधनाला भारतीय आणि जर्मन पेटंट मिळाले आहे.

ज्यामध्ये पाणी, सूर्यप्रकाश यांसारख्या नैसर्गिक स्रोतापासून ग्रीन हायड्रोजनची निर्मिती, त्याचा इंधन म्हणून वापर, कमी कार्बन उत्सर्जन यांचा समावेश होतो.प्रा. डेळेकर, कोयले यांनी धातू ऑक्साईड, कार्बन अब्जांशनलिका आधारित नॅनो समिश्रे वापरून फोटोइलेक्ट्रोकेमिकल पद्धतीने पाण्याचे विभाजन व त्याचा अभ्यास केला.

11 APR 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ परीक्षेत ५४ गैरप्रकार उघडकीस

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षेत ५४ गैरप्रकार उघडकीस आले आहेत. विविध महाविद्यालयांमध्ये या परीक्षांसाठी ३,४२५ विद्यार्थ्यांपैकी ३८१ विद्यार्थी अनुपस्थित होते. आजअखेर ३६ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. दि. १० एप्रिल रोजी पथकाकडून सांगली- २७, कोल्हापूर- २६ आणि सातारा जिल्ह्यातून- १ असे तीन जिल्ह्यांतून एकूण ५४ गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आलेली आहे.

11 APR 2024 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'पीएसआय' परीक्षेत नेर्लीची राखी कांबळे मागासवर्गीयांतून राज्यात पहिली

## परीक्षेचा निकाल जाहीर; ३७८ पदांचा समावेश

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या पोलिस उपनिरीक्षकपदाच्या परीक्षेत नेर्ली (ता. करवीर) येथील राखी रमेश कांबळे हिने अनुसूचित जातीमधील महिला प्रवर्गामध्ये राज्यात पहिला क्रमांक पटकावला.

एमपीएससीच्या वतीने पोलिस उपनिरीक्षकपदासाठीच्या ३७८ जागांसाठी ऑक्टोबर २०२१ मध्ये जाहिरात निघाली. फेब्रुवारी २०२२ मध्ये पूर्व व ९ जुलै, २०२३ रोजी मुख्य परीक्षा झाली. त्यानंतर २ ते १० नोव्हेंबरदरम्यान शारीरिक चाचणी झाली. त्यानंतर मुलाखती झाल्या. बुधवारी सायंकाळी राज्य लोकसेवा आयोगाने निकाल जाहीर केला. राखी कांबळे ही नेर्ली येथील आहे. तिने पहिल्याच प्रयत्नात कोणत्याही खासगी क्लासशिवाय यश संपादित केले आहे. राखीचे प्राथमिक शिक्षण विद्यामंदिर नेर्ली येथे, तर माध्यमिक शिक्षण नेर्ली विद्यालयातून झाले. महाविद्यालयीन शिक्षण शिवाजी विद्यापीठातून घेत अभियंता पदवी मिळवली. वडिलांनी प्रशासकीय सेवेचे ध्येय उराशी बांधून जो यशाचे शिखर गाठण्याचा मार्ग मुलीला दाखवला, त्या यशाच्या अटकेपार झेंडा फडकून वडिलांना तिने खरी श्रद्धांजली अर्पण केली आहे.



राखी कांबळे



आरती कणिरे

आरती जीवनधर कणिरे (मूळ रा. इंगळी, ता. हातकणंगले) हिने पोलिस उपनिरीक्षकपदाच्या परीक्षेत खुल्या प्रवर्गातून १२ वी रँक मिळवली. तिने कन्या मंदिर इंगळी येथे प्राथमिक, त्यानंतर न्यू इंग्लिश स्कूल, इंगळी येथे माध्यमिक, नंतर उच्च माध्यमिक शिक्षण विवेकानंद महाविद्यालयात पूर्ण केले. त्यानंतर शिवाजी विद्यापीठ दूरशिक्षण केंद्रातून एमबीए, एम.कॉम. पूर्ण केले. सध्या केएमसी महाविद्यालयात प्राध्यापिका म्हणून कार्यरत आहेत. कुटुंब सांभाळून हे पद मिळवले. याशिवाय जिल्ह्यातील शिवानी पाटील (कोल्हापूर), विनया मराठे (वडणगे), शुभांगी चव्हाण (केर्ली), प्रियंका पाटील (चंदगड), स्नेहा शिर्के (कळंबा), प्रियंका घाटगे (राधानगरी) यांनी पोलिस उपनिरीक्षकपदासाठी यश मिळवले आहे.

11 APR 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठास 'अन्वेषण' स्पर्धेत तृतीय क्रमांक



लीना चौधरी

कोल्हापूर, ता. १० : भारतीय विद्यापीठ संघ आणि मुंबई विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय अन्वेषण संशोधन महोत्सवात डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाच्या विद्यार्थिनी लीना चौधरी यांनी तृतीय स्थान मिळवले. देशभरातील २८ विद्यापीठे या संशोधन महोत्सवात सहभागी झाली होती. विद्यार्थ्यांमधील नवकल्पकता, वैज्ञानिक दृष्टिकोन ओळखून त्यांना संधी मिळवून देणे, संशोधनवृत्तीला बळ देणे या उद्देशाने या संशोधन महोत्सवाचे आयोजन केले होते.

डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठातर्फे लीना चौधरी यांनी अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान श्रेणीमध्ये 'टिश्यू इंजिनियर इअर पिंना' या विषयावरील सादरीकरण केले. विद्यापीठाच्या स्टेम सेल आणि रीजनरेटिव्ह मेडिसिन आणि मेडिकल बायोटेक्नॉलॉजी विभागाचे प्रमुख डॉ. मेघनाद जोशी यांचा मार्गदर्शनाखाली कानाची विकृती किंवा दुखापत दुरुस्त करण्यासाठी थ्री डी प्रिंटिंग तंत्रज्ञानाचा वापर करून कृत्रिम कान विकसित करण्याचा प्रकल्प संशोधनात सादर केला. या संशोधनासाठी लिना चौधरी यांना तृतीय क्रमांकाने सन्मानित केले. भारतीय विद्यापीठ संघाचे संयुक्त सचिव डॉ. अमरेंद्र पानी यांचा हस्ते २५ हजार रुपयांचे पारितोषिक, चषक आणि प्रमाणपत्र देऊन चौधरी यांचा गौरव करण्यात आला. या संशोधनासाठी रिसर्च डिरेक्टर डॉ. सी. डी. लोखंडे यांचे मार्गदर्शन मिळाले. या यशाबद्दल कुलपती डॉ. संजय पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष आमदार सतेज पाटील, विश्वस्त आमदार ऋतुराज पाटील, विश्वस्त पृथ्वीराज पाटील, कुलगुरू डॉ. राकेश कुमार मुदगल व कुलसचिव डॉ. व्ही. व्ही. भोसले यांनी अभिनंदन केले.

11 APR 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महावीर अध्यासनाला देसाई यांची देणगी

कोल्हापूर, ता. १० : सांगली येथील बाळासाहेब शामराव देसाई यांनी शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाच्या प्रस्तावित इमारत बांधकामासाठी ५० हजार रुपयांची देणगी दिली.